सकाळ

सातारा, मंगळवार, ५ ऑक्टोबर २०२१

# रयत विद्यापीठाची लवकरच घोषणा करू

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत; संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त कार्यक्रम

सातारा, ता. ४ : रयत शिक्षण संस्था ही आदर्श शिक्षण संस्था आहे. या संस्थेचा आदर्श जगातील सर्व शिक्षण संस्थांनी घेतला पाहिजे. संस्थेला पूर्ण सहकार्य केले जाईल. कर्मवीरांनी रयत ग्रामीण विद्यापीठाचे जे स्वप्न पाहिले होते, त्याची घोषणा सरकार लवकरच करेल, अशी ग्वाही उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

रयत शिक्षण संस्थेचा आज १०२ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्त यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात मंत्री सामंत बोलत होते. कार्यक्रमास संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील, आमदार बाळाराम पाटील (रायगड), संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार रामशेठ ठाकूर, शिक्षण संचालक हेमंत कचरे, संस्थेच्या सहसचिव प्राचार्या डॉ. प्रतिभा गायकवाड, प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. शिक्षणमंत्री सामंत यांनी संस्थेच्या कार्याचा गौरव केला. रयत शिक्षण संस्था



सातारा : यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सच्या सभागृहात सोमवारी झालेल्या कार्यक्रमात बोलताना उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत. त्यावेळी डॉ. प्रतिभा गायकवाड, डॉ. विठ्ठल शिवणकर, रामशेठ ठाकूर, डॉ. अनिल पाटील, आमदार बाळाराम पाटील, हेमंत कचरे.

(उल्हास भिडे : सकाळ छायाचित्रसेवा)

नियमात चालणारी संस्था आहे. केवळ गुणवंत विद्यार्थी येथे घडतात असे नाही तर त्या विद्यार्थ्यांना उद्योग व्यवसाय, नोकरी मिळेल, असे त्यांना तयार केले जाते. म्हणूनच यापुढेही संस्थेला कायम राजाश्रय राहील, असे सांगून मंत्री सामंत म्हणाले, "शासनाची चरित्र साधन समिती कर्मवीरांच्या चरित्रावरही काम करेल. कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चरित्रे प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोचली पाहिजेत, यासाठी शिक्षण विभाग काम करणार आहे. लवकरच साकारले जाणारे रयत ग्रामीण विद्यापीठ हे जगातील विद्यापीठांना आदर्श झाले पाहिजे. एवढेच नव्हे तर राज्यातील सर्व विद्यापीठे देशाला दिशा देणारी ठरली पाहिजेत, असा आमचा प्रयत्न राहील."

डॉ. अनिल पाटील यांनी कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे यांच्या दृढ संबंधाची या वेळी माहिती दिली. संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी संस्थेच्या उपक्रमांची माहिती दिली. संस्थेतील आदर्श शाळा, महाविद्यालये, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्या डॉ. गायकवाड यांनी आभार मानले.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा